पर्यावरण विभाग,
पुणे महानगरपालिका
जा.क्र.
दिनांक:

**कार्यालयीन परिपत्रक**

विषय: पुणे शहरातील बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी धूलीकणांमुळे होणारे वायू प्रदूषण नियंत्रण करणेकरिता सेन्सर-आधारित वायू गुणवत्ता तपासणीसाठी प्रणाली उभारणेसाठी व केंद्रीकृत डॅशबोर्ड विकसित करण्यासाठी Task Force Committee गठित करण्याबाबत.

संदर्भ: **:- १)**MPCB यांचेकडील पत्र क्र. MPCB/JD (APC)/TB/B-0236 दि. ०२/११/२०२३
२) MPCB यांचे GRAP कार्यान्वित करणेबाबचे दि. १३/१०/२०२३ रोजीचे पत्र.
३) MPCB यांचे हवा प्रदूषण नियंत्रण करणेबाबतची दि. २७/१०/२०२३ रोजीची मार्गदर्शक तत्वे.
४) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांचे समवेत दि. २८/०८/२०२५ रोजी WRI संस्थेचे प्रतिनिधी, CREDAI, मराठी बांधकाम व्यवसायिक, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (NAREDCO) सेन्सर उत्पादक, बांधकाम परवाना विभाग व पर्यावरण विभाग, पुणे म.न.पा. यांची झालेली बैठक.

उपरोक्त संदर्भांकित पत्र क्र. १ नुसार बांधकाम प्रकल्पांचे ठिकाणी सेन्सर आधारीत वायू गुणवत्ता देखरेख प्रणाली बसवून हवा प्रदूषण गुणवत्ता निर्देशांक मोजण्यात यावा तसेच सदर हवेची गुणवत्ता संबंधीत माहिती महानगरपालिका स्तरावर वेळोवेळी तपासणी करिता उपलब्ध करून देण्यात यावी असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत पुणे महानगपालिकेस निर्देश देण्यात आले आहेत. संदर्भांकित पत्र क्र. २ अन्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी महाराष्ट्रातील सर्व शहरांना हवा गुणवत्ता सुधारणे करिता ग्रेडेड रिस्पॉन्स क्शन प्लॅन (GRAP) कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संदर्भ क्रमांक ३ अन्वये हवा प्रदूषण नियंत्रण करणेकरिता हवा प्रदूषणाचे विविध स्त्रोतानुसार मार्गदर्शक तत्वे देखील सांगण्यात आले आहेत. यास अनुसरून मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांचेसमवेत दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी WRI संस्थेचे प्रतिनिधी, CREDAI, मराठी बांधकाम व्यवसायिक, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (NAREDCO) सेन्सर उत्पादक, बांधकाम परवाना विभाग व पर्यावरण विभाग, पुणे म.न.पा.यांची बैठकित सविस्तर चर्चा झाली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, यांच्यामार्फत पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, कलम ५ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित वायू गुणवत्ता देखरेख प्रणाली उभारणे आवश्यक आहे. प्रदूषणाची पातळी निर्देशित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होते तेव्हा त्यास नियंत्रित करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने बांधकाम प्रकल्पांवरील वायू गुणवत्ता प्रभावीपणे तपासण्यासाठी तसेच बांधकाम व्यावसायिकांना व विकासकांना वायू प्रदूषण नियंत्रणासाठी मार्गदर्शन करण्याकरिता आणि सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी, या अनुषंगाने पुणे महानगरपालिका खालीलप्रमाणे टास्क फोर्स समिती स्थापन करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **विभाग/ संस्थेचे नाव** | **समितीमधील पद** |
|---|---|---|---|
| १ | अतिरीक्त महापालिका आयुक्त (इ) | पुणे महानगरपालिका | अध्यक्ष |
| २ | शहर अभियंता | पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ३ | अधिक्षक अभियंता | पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ४ | उप प्रादेशिक अधिकारी | पुणे प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ५ | सचिन घुडे | **Project Director**, SAFAR IITM (MoES), Pune | सदस्य |
| ६ | हर्षवर्धन भोईटे | (सिनीअर असोसिएट, एअर क्वॉलिटी) | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | | WRI | |
| ७ | देवराज पाटील | CREDAI | सदस्य |
| ८ | नितीन देशपांडे | मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन | सदस्य |
| ९ | पाटे वाणी | NAREDCO | सदस्य |
| १० | उप आयुक्त | पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका | सदस्य सचिव |

**Task Force Committee ची उद्दिष्टे व कार्य**

१) बांधकाम प्रकल्पांवरील सेन्सरमधील माहिती एकत्रित करण्यासाठी केंद्रीकृत डॅशबोर्ड विकसित करणे व प्रक्रिया सुलभ करणे.
२) बांधकाम प्रकल्पांवर सेन्सर-आधारित वायू गुणवत्ता देखरेख प्रणाली प्रभावीपणे राबविणे.
३) डॅशबोर्ड कार्यान्वित करणे.
४) संबंधित घटकांसाठी क्षमता वृद्धी व प्रशिक्षण करणे.
५) बांधकाम प्रकल्पांचा डेटाबेस तयार करणे.
६) बांधकाम प्रकल्पांचा सेन्सर आधारीत वायू गुणवत्ता देखरेख प्रणाली संबंधीत GRAP Inspection Report तयार करणे.
७) सर्व संबंधितांकडून सूचना व शिफारसी संकलित करून धोरणात्मक मार्गदर्शन करणे.

या Task Force Committee चे कामकाज पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या देखरेखीखाली पार पडेल.

Signed by Santosh Suresh Varule
Date: 02-09-2025 12:25:29

प्रत:-

- मा. महापालिका आयुक्त
- मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ/ज/वि)

....माहितीस्तव सादर

- सर्व खातेप्रमुख
- सर्व परिमंडळ कार्यालय (१ ते ५)
- सर्व क्षेत्रीय कार्यालय (१ ते १५) पुणे महानगरपालिका

.....पुढील कार्यवाहीस्तव